**लष्करी आणि लष्करी तांत्रिक सहकार्यावरील भारत-रशिया आंतर-सरकारी आयोगाचे मॉस्को येथे 21वे सत्र**

10 डिसेंबर 2024

संरक्षण मंत्री श्री. राजनाथ सिंह आणि रशियाचे संरक्षण मंत्री श्री. आंद्रेई बेलौसोव यांनी 10 डिसेंबर 2024 रोजी मॉस्को येथे लष्करी आणि लष्करी तांत्रिक सहकार्यावरील भारत-रशिया आंतर-सरकारी आयोगाच्या (IRIGC-M&MTC) 21व्या सत्राचे सह-अध्यक्षत्व भूषविले. भारत-रशिया संबंध अतिशय मजबूत आहेत आणि त्यांनी विशेष आणि विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारीच्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत यावर संरक्षण मंत्र्यांनी भर दिला. ते पुढे म्हणाले की, 2024 मध्ये पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दोन रशिया दौऱ्यांसह अलीकडील देवाणघेवाणीमुळे संबंध अधिक दृढ झाले आहेत.

2. श्री. राजनाथ सिंह यांनी आपल्या देशांतर्गत संरक्षण उद्योगाच्या क्षमता संपूर्ण क्षेत्रांमध्ये आणि औद्योगिक सहकार्यामध्ये विस्तारित करण्याचा भारत सरकारचा निर्धार व्यक्त केला. त्यांनी 'मेक इन इंडिया' प्रकल्पांमध्ये रशियन उद्योगांचा सहभाग वाढवण्यासाठी नवीन संधींवर भर दिला. रशियासोबत विशेष आणि विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारीबाबत भारताच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला.

3. रशियाच्या संरक्षण मंत्र्यांनी दोन्ही देशांमधील परस्पर विश्वासावर आधारित संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला. INS तुशील कार्यान्वित झाल्याबद्दल त्यांनी संरक्षण मंत्र्यांचे अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले की, 2021-31 साठी लष्करी तांत्रिक सहकार्य कराराच्या अंमलबजावणीमुळे 'मेक इन इंडिया'ला आवश्यक गती मिळेल. श्री. राजनाथ सिंह यांनी मंत्री बेलौसोव यांना 2025 मध्ये IRIGC-M&MTC च्या 22 व्या सत्राच्या सह-अध्यक्षतेसाठी भारत भेटीकरिता आमंत्रित केले. आमंत्रण स्वीकारले गेले.

4. शेवटी, दोन्ही मंत्र्यांनी सहकार्याच्या चालू आणि संभाव्य क्षेत्रांना अधोरेखित करून 21व्या IRIGC-M&MTC बैठकीच्या प्रोटोकॉलवर स्वाक्षऱ्या केल्या.

5. बैठकीपूर्वी संरक्षण मंत्र्यांनी मध्य मॉस्को येथील रशियन संरक्षण मंत्रालयात गार्ड ऑफ ऑनरची पाहणी केली. तत्पूर्वी, त्यांनी दुसऱ्या महायुद्धात वीरगती प्राप्त झालेल्या सोव्हिएत सैनिकांच्या स्मरणार्थ मॉस्कोमधील 'अज्ञात सैनिक स्मारक' येथे पुष्पचक्र अर्पण केले.

**नवी दिल्ली**

**10 डिसेंबर 2024**